॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
जनसंपर्क विभाग



जळगाव, दि. २६ ऑक्टोबर :: महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने यंदाचा आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव 'युवारंग २०२६' अनावश्यक खर्चाला फाटा देत साधेपणाने आणि काटकसरीने आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. दरवर्षी या महोत्सवासाठी सुमारे ५५ लाख रुपयांचा निधी खर्च केला जातो. मात्र, यंदा उपलब्ध निधीचा कमीतकमी वापर करून होणाऱ्या आर्थिक बचतीचा विनियोग दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या शुल्कात सवलती देण्यासाठी करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे यंदाचा युवारंग हा केवळ सांस्कृतिक महोत्सव न राहता सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम ठरणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित करण्यात येणारा हा महोत्सव २७ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत होणार आहे. 'सामाजिक समता ते समरसता' ही महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना असून, विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना आपली कला, कौशल्य, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक प्रतिभा सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचबरोबर सामाजिक एकात्मता, संवेदनशीलता आणि सामूहिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे.

काटकसरीतून सामाजिक बांधिलकीचा संदेश

युवारंग महोत्सवासाठी दरवर्षी सुमारे ५५ लाख रुपयांचा निधी खर्च होतो. मात्र, राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि त्याचा सर्वसामान्य नागरिकांसह विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन यंदा महोत्सवाचे आयोजन साध्या पद्धतीने करण्यावर भर देण्यात आला आहे. ज्या बाबींमध्ये खर्च कमी करणे शक्य आहे, त्या ठिकाणी जाणीवपूर्वक बचत करून उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर केला जाणार आहे.

महोत्सवाची सांस्कृतिक उंची, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि विविध कलाप्रकारांना मिळणारे व्यासपीठ कायम ठेवत अनावश्यक खर्च टाळण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. उत्सवाचा अनावश्यक थाट कमी करून सामाजिक गरजांना प्राधान्य देण्याचा हा निर्णय शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणारा ठरणार आहे.

बचतीचा विनियोग दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी

युवारंगच्या आयोजनातून होणाऱ्या आर्थिक बचतीचा उपयोग दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी करण्याचे नियोजन विद्यापीठाने केले आहे. विद्यापीठाच्या विविध वसतिगृहांतील प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क तसेच इतर संबंधित शुल्कांमध्ये सवलती देऊन विद्यार्थ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणींमुळे थांबू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. आर्थिक संकटामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संधींवर परिणाम होऊ नये आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवण्यासाठी मदत मिळावी, या दृष्टीने युवारंगमधून होणारी बचत महत्त्वाची ठरणार आहे.

'समता ते समरसता' संकल्पनेवर विविध स्पर्धा

२७ ऑक्टोबर रोजी विविध महाविद्यालयांतून येणाऱ्या संघांचे आगमन आणि दुपारी २ ते ४.३० या वेळेत नोंदणी होणार आहे. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत महोत्सवाचा उद्घाटन समारंभ होईल. त्यानंतर दुपारी १ वाजल्यापासून विविध रंगमंचांवर स्पर्धांना सुरुवात होणार आहे.

'सामाजिक समता ते समरसता' या संकल्पनेवर आधारित महोत्सवासाठी एकूण पाच रंगमंचांची व्यवस्था करण्यात आली आहे. व महापुरुषांची नावे या रंगमंचांना देण्यात आली आहे. यात महात्मा फुले सभागृहातील रंगमंच क्रमांक १ वर पाश्चिमात्य समूहगान, भारतीय शास्त्रीय नृत्य, भारतीय लोकसंगीत वाद्यवृंद, भारतीय समूहगान, लोककला समूह नृत्य आणि सुगम संगीत अशा स्पर्धा होतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहातील रंगमंच क्रमांक २ वर शास्त्रीय वादन, भारतीय शास्त्रीय गायन, पाश्चात्य एकल गायन आणि नाट्यसंगीत स्पर्धा आयोजित करण्यात येतील. शाहीर अण्णाभाऊ साठे सभागृहातील रंगमंच क्रमांक ३ वर मूकनाट्य, प्रहसन, मिमिक्री आणि एकांकिका सादर होतील.

संत रविदास सभागृहातील रंगमंच क्रमांक ४ वर वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धा पार पडतील. तर संत गाडगेबाबा सभागृहातील रंगमंच क्रमांक ५ वर ऑन द स्पॉट पेंटिंग, कोलाज, क्ले मॉडेलिंग, स्पॉट फोटोग्राफी, पोस्टर मेकिंग, रांगोळी, इन्स्टॉलेशन आणि मेहंदी अशा ललित कलांच्या स्पर्धा २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान होतील.

३१ ऑक्टोबरला पारितोषिक वितरण व समारोप

महोत्सवाच्या अंतिम दिवशी, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता रंगमंच क्रमांक १ येथे पारितोषिक वितरण आणि समारोप समारंभ होणार आहे. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि महाविद्यालयांचा यावेळी गौरव करण्यात येईल.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वागताध्यक्ष डॉ. राजेंद्र नन्नवरे, कार्याध्यक्ष ॲड. अमोल पाटील, समन्वय समिती अध्यक्ष नितीन झाल्टे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. प्रविण महाले यांच्यासह आयोजन समिती परिश्रम घेत आहे.

कला, संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देतानाच दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देण्याचा प्रयत्न यंदाच्या युवारंगमधून केला जाणार आहे. त्यामुळे 'सामाजिक, समता ते समरसता' या संकल्पनेला सामाजिक बांधिलकीची जोड देणारा हा महोत्सव ठरणार आहे.

.....

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २६ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

जनसंपर्क अधिकारी करीता